# आयसीआयसीआय लोम्बार्डची फ्लिपकार्टसोबत भागीदारी, त्यांच्या ग्राहकांना देणार हॉस्पिकॅशचे फायदे

*५०० रुपयांच्या डेली कॅश लाभासह ग्रूप सेफगार्ड इन्शुरन्स अंतर्गत हॉस्पिकॅश लाभांमुळे फ्लिपकार्ट ग्राहकांना मिळणार संरक्षण*

**बंगळुरू - १७ फेब्रुवारी २०२१ :** फ्लिपकार्ट या भारतातील अंतरदेशीय ई-कॉमर्स बाजारपेठेने आयसीआयसीआय लोम्बार्डसह भागीदारी करून त्यांच्या ग्राहकांना ग्रुप इन्शुरन्स पॉलिसी देऊ करण्यासाठी ग्रुप सेफगार्ड इन्शुरन्स सादर केला आहे. नेहमीच्या नुकसान भरपाई संदर्भातील आरोग्य विमा योजनांच्या तुलनेत ग्रुप सेफगार्ड ही एक लाभकारक योजना आहे. यात ग्राहकांना हॉस्पिटलमधील प्रत्येक दिवसासाठी पेआऊट मिळवता येतो. रोजच्या ठरलेल्या रकमेमुळे ग्राहकांना तातडीने करावे लागणारे वैद्यकीय व इतर खर्च करता येतात. हा विमा परवडणाऱ्या दरातील, कागदपत्रविरहित आहे आणि यात अपघातातील हॉस्पिटलायझेशन किंवा ठरवून केलेल्या शस्त्रक्रिया/उपचार अशा दोन्ही प्रकारांचा समावेश आहे.

हॉस्पिटलमध्ये असताना भारतीयांचा बराच खर्च होतो. केंद्रीय स्टॅटिस्टिक अ‍ॅण्ड प्रोग्राम इम्प्लिमेंटेशन मंत्रालयानुसार[1] भारतात हॉस्पिटलायझेशनच्या काळातील थेट आपल्या खिशातून केला जाणारा सरासरी खर्च दर व्यक्तिमागे ४४५२ रु. ते ३१८४५ रु. इतका आहे. तर, हॉस्पिटलायझेशनमुळे उत्पन्नातील सरासरी नुकसान दररोज ८१६४ रु. इतके आहे. आयसीआयसीआय लोम्बार्डच्या हॉस्पिकॅश लाभामुळे ग्राहकांना आपल्या खिशातून कराव्या लागणाऱ्या इतर खर्चांची तरतूद होते, मग ते तातडीचे वैद्यकीय खर्च असोत, प्रवास, डिस्चार्जनंतरचा खर्च किंवा हॉस्पिटलायझेशनच्या काळात झालेले उत्पन्नाचे नुकसान असो.

**फ्लिपकार्टच्या फिनटेक अ‍ॅण्ड पेमेंट ग्रुपचे प्रमुख रंजित बोयनपल्ली** म्हणाले, "*आमच्या ग्राहकांना मूल्यवर्धित सेवा देण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करत असतो. आरोग्य विम्याचे महत्त्व जाणणाऱ्या ग्राहकांची संख्या वाढत असताना फ्लिपकार्ट हे त्यांना सर्वसमावेशक हेल्थ प्रोटेक्शन प्लॅन देणारे एकथांबी पर्याय ठरावे, असा आमचा प्रयत्न आहे. हॉस्पिकॅश लाभांमुळे ग्राहकांना आता इतर खर्चांपासूनही स्वत:ला संरक्षण देता येईल. बहुतांश वेळा हे खर्च त्यांच्या बचतीवर डल्ला मारतात. या क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट विमा पर्याय आमच्या व्यासपीठावर देऊ करत आमच्या ग्राहकांचा हा प्रवास अधिक सहजसोपा व्हावा आणि त्यांना सगळी माहिती असावी, हा आमचा उद्देश आहे.*"

**आयसीआयसीआय लोम्बार्डचे कार्यकारी संचालक संजीव मंत्री** म्हणाले, "*आयसीआयसीआय लोम्बार्डमध्ये ग्राहकांना नाविन्यपूर्ण आणि कॉंटॅक्टलेस विमा पर्याय पुरवण्याचा आमचा प्रयत्न असतो. फ्लिपकार्ट या भारतातील एका आघाडीच्या ई-कॉमर्स पोर्टलसोबत भागीदारी करत ऑनलाइनस्नेही ग्राहकांपर्यंत पोहोचून*

---
[1] Union Ministry of Statistics and Programme Implementation

*त्यांना व त्यांच्या प्रियजनांना आपातकालीन स्थितीत सुरक्षित ठेवण्याच्या त्यांच्या गरजा पूर्ण करण्यात साह्य करताना आम्हाला आनंद होत आहे. ग्रुप सेफगार्ड इन्शुरन्स अंतर्गत आमची हॉस्पिकॅश योजना परवडणाऱ्या दरातील आणि सोयीस्कर आहे. यामुळे हॉस्पिटलायझेशनच्या काळात ग्राहकांना त्यांच्या दैनंदिन खर्चांमध्ये साह्य होईल. ग्राहकांच्या गरजेच्या वेळी त्यांच्या सोबत राहून, त्यांचा हात हातात घेऊन पुढे जात 'निभाए वादा' हे आमच्या ब्रॅंडचे ब्रीद यातून प्रतीत होत आहे."*

| **वैशिष्ट्ये** | **तरतुदी** |
|---|---|
| डेली कॅश बेनिफिट | दररोज ५०० ते २००० रु. |
| समावेश | अपघात व आजाराशी संबंधित हॉस्पिटलायझेशन |
| विम्याची रक्कम | दररोज ५००, १०००, १५००, २००० रु. (हॉस्पिटलायझेशनच्या एकूण लाभांवर - ९० दिवसांपर्यंतच्या हॉस्पिटलायझेशनचा समावेश) |
| हॉस्पिटल नेटवर्क | ६५०० हून अधिक |
| हेल्थ क्लेम रेशिओ | ९९.८७ %* |
| प्रतीक्षा कालावधी | ३० दिवस |
| किमान हॉस्पिटलायझेशन | २४ तास |

**आजघडीस. आयसीआयसीआय लोम्बार्डने दिलेल्या माहितीनुसार*

भारतीय ग्राहकांच्या गरजा आणि प्राधान्यक्रम यांची उत्तम जाण असलेल्या फ्लिपकार्टने मागील वर्षभरात जीवन, आरोग्य, मोटर आणि सायबर विमा क्षेत्रात देशातील काही आघाडीच्या विमा सेवा प्रदाता कंपन्यांसोबत भागीदारी करत प्रवेश केला आहे. लाखो ग्राहकांना त्यांच्या वैविध्यपूर्ण गरजांवर आधारित वैयक्तिक आणि सहजसोपे विमापर्याय उपलब्ध करून देणे, हा फ्लिपकार्टचा उद्देश आहे.

आयसीआयसीआय लोम्बार्ड नाविन्यपूर्ण आणि तंत्रज्ञानाधारित बिगर-जीवन विमा पर्याय सादर करण्यात आघाडीवर आहे. इतकेच नाही, त्यांनी सहजसोपी ग्राहकसेवा, विमा विकत घेणे/नूतनीकरण, क्लेम सेटलमेंट इत्यांदीसाठी आर्टिफिशिअल इंटेलिजन्स आणि रोबोटिक्स यासारखे आधुनिक तंत्रज्ञानही देऊ केले आहे. यातून ग्राहकांना अधिक सक्षम केले जाते आणि त्यांना कुठूनही, कधीही अगदी सोयीस्कररित्या सर्वोत्कृष्ट विमापर्याय घेणे शक्य होते.

**About the Flipkart Group**

The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, and Flipkart Wholesale. Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants, and small businesses to be a part of India's e-commerce revolution, with a registered customer base of over 300 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratize e-commerce in India, drive access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem and empower generations of entrepreneurs and MSMEs have inspired us to innovate on many industry firsts. The recent launch of Flipkart Wholesale, our new digital marketplace, is a testament to our commitment to accelerate the growth of kiranas and MSMEs in India. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns – customer-centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with Myntra, which holds a prominent position in the online fashion market and now Flipkart Wholesale, the Flipkart Group will continue to steer the transformation of commerce in India through technology.

**For more information, please contact media@flipkart.com**

**About ICICI Lombard General Insurance Company Ltd**

We are the leading private-sector non-life insurer in India based on gross direct premium income in fiscal 2020 (Source: IRDAI). We offer our customers a comprehensive and well-diversified range of products, including motor, health, crop, fire, personal accident, marine, engineering and liability insurance, through multiple distribution channels. More details are available at www.icicilombard.com.

**For details, contact**


| | |
|---|---|
| **ICICI Lombard GIC Ltd.**<br>Seema Jadhav<br>corporate.communication@icicilombard.com<br>Tel: +91 7045926209 | **Adfactors PR**<br>Sailee Nayak<br>sailee.nayak@adfactorspr.com<br>Tel: +91 99301667115 |